Rayat Shikshan Sansthas

# Rajarshi Chhatrapati Shahu College Kolhapur

---

# Rayat Corona Help Centre

In keeping with the vision and mission of our institution to inculcate the humanistic values among the stockholders, our Parent Institution in collaboration with Kolhapur Municipal Corporation and White Army Kolhapur initiated the robust plan to tackle the pandemic. The "Rayat Corona Help Centre" was established in the backdrop of Covid -19 pandemic at Digambar Jain Boarding, Kolhapur. Out of 100 beds available at the center, provision of 20 beds was done by our Parent Institution.10 beds were specially reserved for *Rayat Sevak* and their families.

Standard precautionary protective measures like sanitization facility, plan to ensure to regular cleaning for disinfection, provision of disposable gloves. medical equipment's, Medicine, PPE kits were made available to prevent contracting any potential infections.

This center was working 24 hours for Malkapur, Kolhapur and Rajapur colleges and Secondary School group no.13 clubbed under western zone of Rayat Shikshan Sanstha.

The structured mechanism was followed by composition of various committees for this purpose. Each Committee member devotedly completed the task allotted to them. The awareness regarding the need of vaccination and necessary health measures to be taken was created among the staff and students. The regular checkup of body temperature and oxygen level of staff and students was also taken care of in the campus.

The Parent Institution strictly monitored the percentage of vaccination and Covid cases detected if any. A structured mechanism was followed by submitting daily report to the management.

The financial assistant of RS. 3 Crore 76 Lakhs was given to chief Minister relief fund from our Parent Institution. Rs.1 Crore 50 lacks fund was specially reserved for the welfare of students and staff. Nearly 1000 teachers worked as volunteers at various help centers.

On the occasion of birthday of Hon. Dr. N D Patil , Vice President , Rayat Shikshan Sanstha Satara; our Institution rendered financial assistant of Rs.46,500 to Dr. N D Patil Pratishthan for helping Covid patients. Distribution of fruits at different Covid centers in Kolhapur was also done on this occasion.

IQAC Coordinator
R. C. Shahu College,
Kolhapur.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE
KOLHAPUR

I/C Principal,
Rajarshi Chh. Shahu College
Kolhapur.

# Some News from newspapers

लोकमत

## ‘रयत’कडून २ कोटी ७६ लाखांचा धनादेश सुपूर्द

■ लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : राज्यभर विखुरलेल्या सुमारे ११ हजार रयत सेवकांनी दीड दिवसाचा पगार देऊन दाखवलेल्या दातृत्वातून तब्बल सव्वाचार कोटी रुपयांचा निधी उभा केला आहे. यातील पावणे तीन कोटी मुख्यमंत्री निधीसाठी संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचा प्रत्येक शिक्षक आणि सेवकाला कोरोना महामारीच्या काळात आश्वस्त करण्याच्या दृष्टीने संस्थेने काही महत्त्वपूर्ण निर्णयही घेतले होते. रयतच्या ११ हजार रयत सेवकांनी त्यांचा एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री निधीला देण्याचे ठरविले. यातून २ कोटी ७६ लाख रुपयांचा निधी जमा झाला. तर दीड कोटी अर्धा दिवसाचा पगार विद्यार्थी आणि सेवकांची



रयत शिक्षण संस्थेतर्फे अध्यक्ष शरद पवार यांनी मदतीचा धनादेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला.

सहाय्यता करण्यासाठी राखून ठेवला आहे.

रयत सेवक कोरोनाबाधित झालाच तर त्याला बँकेमार्फत ऑनलाईन एक लाख रुपयांचे कर्ज तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे बाधित सेवकाच्या कुटुंबीयांची परवड होणार नाही.

याबरोबरच रयतच्या विद्यार्थ्यांना कोरोनाची बाधा झालीच तर त्यांच्यासाठी काही रक्कम मदत स्वरूपात देण्यात येणार आहे. तब्बल १ हजार ४४० रयत सेवक कोविड कामासाठी कार्यरत आहेत.

### रयतच्या १९० इमारतींमध्ये कोविड सेंटर

भविष्यात कोविड बाधित विद्यार्थांना आर्थिक मदत देण्याचाही संस्थेचा प्रयत्न आहे. संस्थेच्या सेवकांनी अर्धा दिवसाचा पगार दिला आहे. यातून उभा राहिलेला निधी संस्थेच्या कोविडग्रस्त विद्यार्थ्यांसह, तासिकातत्त्वावर काम करणाऱ्या सेवकांना देण्यात येणार आहे. रुग्णाला केलेल्या खर्चापोटी आर्थिक मदत या रकमेच्या माध्यमातून रयत करणार आहे.

ही मदत विद्यार्थासाठी पुरेशी नसली तरीही फूल ना फुलाची पाकळी म्हणून ती देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. रयतने राज्यभरात १९० इमारती कोविड उपचारांच्या अनुषंगाने शासनाला वापरासाठी दिल्या आहेत.

Kolhapur Main
Page No. 7 Nov 10, 2020
Powered by: erelego.com

तरुण भारत दि.२२सप्टेंबर२०२०

## रयत संस्था उभारणार ३८ मदत केंद्रे

### प्राचार्य डॉ. विठ्ठलराव शिवणकर यांची माहिती ; कोविड रूग्णांसाठी १० बेडची उपलब्धता

विजय जाधव
गोडोली

जगभरात कोरोनाचा कहर वाढत असून बाधितांची उपचाराविना गैरसोय होत आहे. सामाजिक बांधिलकीतून रयत शिक्षण संस्थेच्यावतीने राज्यात संस्थेच्या महाविद्यालयात येत्या काही दिवसात १० बेड असलेली तब्बल ३८ रयत मदत केंद्रांची उभारणी करणार आहे. यात रूग्णांसाठी ऑक्सिजन, वैद्यकिय सुविधा, उपचारासाठी योग्य मार्गदर्शनासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध असणार आहे. याचा रयत सेवक, त्यांचे कुटूंबीय, विद्यार्थ्यांना या केंद्राचा लाभ होणार असल्याची माहिती सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठलराव शिवणकर यांनी 'तरूण भारत' शी बोलताना सांगितली.

रयत शिक्षण संस्था सातारा

रयत संस्थेकडून नेहमीच सामाजिक संकटात शक्य ती मदत करून बांधिलकी जोपासत योगदान दिले आहे. दुष्काळात अनेक गावांच्या ओढा खोलीकरण, गाळ काढून जल संधारणासाठी केलेले कार्य, पूरग्रस्तांसाठी मदत, कोरोनाच्या संकटात मुख्यमंत्री सहाय्यता निधीला भरीव आर्थिक निधी देण्यात रयत सेवकांचे मोठे योगदान आहे. सध्या कोरोनाच्या महामारीत ही वाढत्या रूग्ण संख्येने शासकिय आणि खासगी यंत्रणेवर उपचाराचा ताण येत आहे. तो थोडाफार कमी करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने राज्यात तब्बल ३८ कोरोना रूग्णांसाठी रयत मदत केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनातून संस्थेच्या महाविद्यालयात अशी केंद्र सुरू होणार आहेत. रयत सेवक, त्यांच्या कुटूंबातील सदस्य, विद्यार्थ्यांना या केंद्राची मदत होणार आहे. प्रत्येक केंद्रात ऑक्सिजन मशीन, प्राथमिक औषधोपचाराची व्यवस्था, रूग्ण वाहिका, शासकिय, खासगी रूग्णालयातील उपचारांची माहिती, वैद्यकिय मदतीसाठी तत्पर व्यवस्था सुसज्ज ठेवण्यात येणार आहे. रयतचे माजी विद्यार्थी जे वैद्यकिय तज्ञ आहेत, त्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

जिल्ह्यात शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद, दहिवडी कॉलेज, डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव, एसजीएम कॉलेज कराड, वायसी कॉलेज सातारा येथे ही मदत केंद्र लवकरच सुरू होणार आहेत. यासाठी सहसचिव प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड, संजय नागपूरे, ऑडिटर प्राचार्य डॉ. शिवलींग मेनकुदळे यांच्यासह रयत सेवका परिश्रम घेत आहेत.

लोकमत

# रयत शिक्षण संस्थेकडून व्हाईट आर्मीच्या कोविड सेंटरला २० बेड

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापुरातील व्हाईट आर्मीच्या जैन बोर्डिंगमधील कोविड सेंटरसाठी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने मंगळवारी मान्यवरांच्या उपस्थितीत २० बेड देण्यात आले.

कोल्हापूर : महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते मंगळवारी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त आणखी २० बेड देण्याचा निर्णय रयत शिक्षण संस्थेने घेतला. जैन बोर्डिंगमधील कोविड सेंटर येथे आता एकूण १०० बेड झाले असून, त्याचा सर्वसामान्य लोकांना चांगला उपयोग होत आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील शालेय जीवनात दिगंबर जैन बोर्डिंग येथे राहत होते. त्यांची जी खोली होती, ती रूम नंबर ७ सजविण्यात आली.

यावेळी प्रतिमापूजन करण्यात आले. जैन बोर्डिंगचे संचालक व कोल्हापूर चेंबर्स ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, केमिस्टस असोसिएशनचे राज्य संघटक मदन पाटील, रयत शिक्षण संस्था, सातारा व्यवस्थापन समिती सदस्य एम. बी. शेख, प्राचार्य सुरेश साळुंखे, कोल्हापूर जिल्हा इरिगेशन फेडरेशनचे अध्यक्ष विक्रांत पाटील, आझाद चौक प्ले कॉर्नरचे मुकुंद शिंदे, अनिल धडाम, अनुप भिवटे, व्हाईट आर्मीचे विनायक भाट, अरविंद लवटे, सिद्धेश पाटील, सिस्टर हिना यादवाड, सिस्टर सेलवेना उपस्थित होते. व्हाईट आर्मीचे अध्यक्ष अशोक रोकडे यांनी आभार मानले.

Hello Kolhapur
Page No. 2 Sep 27, 2020
Powered by: erelego.com

सकाळ

# डॉ. एन. डी. पाटील संघर्षातून संघर्षाकडे जाणारे जीवनप्रवासी

## प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील; राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कदमवाडी, ता. १६ : 'ज्या नेत्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे तत्त्वज्ञान मांडले, ते नेते विफलग्रस्त होऊन पक्ष सोडून गेले. अशा वेळी कर्मवीर अण्णांची परवानगी नसताना रयत संस्थेतील प्राध्यापकाची नोकरी सोडून त्यांनी मुंबईत तुटपुंज्या मानधनावर गिरणी कामगार युनियनचे सचिव म्हणून पक्षनिष्ठेने कार्य सुरू केले. शोषणमुक्त, समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी अखंड आयुष्य समर्पित केले आणि ते महाराष्ट्राचा आधारवड बनले. हा प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचा जीवनप्रवास संघर्षातून संघर्षाकडे जाणारा ठरला,' असे प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी सांगितले.

### 'सकाळ माध्यम समूह', 'व्हाईट आर्मी'च्या कोविड सेंटरसाठी सव्वा लाखाची औषधे देण्यात येणार

वाढदिवसानिमित्त जैन बोर्डिंग येथे 'सकाळ माध्यम समूह' आणि 'व्हाईट आर्मी'तर्फे चालविण्यात येणाऱ्या कोविड सेंटरसाठी सरोज पाटील (माई), डॉ. एम. ए. शेख, डॉ. मोहन राजमाने, डॉ. आर. एस. डुबल, डॉ. एन. डी. पाटील प्रतिष्ठान, शाहू महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांमार्फत एक लाख २५ हजार रुपये किमतीची औषधे देण्यात येतील, असे जाहीर करण्यात आले. जैन बोर्डिंग येथील कोविड सेंटर आणि बाल संकुल येथे फळे वाटप करण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा, शेतीमालाचा प्रश्न, शिक्षणविषयक श्वेतपत्रिका कायद्याविरुद्धचा संघर्ष, 'सेझ'चा लढा, रयत शिक्षण संस्थेतील एन. डी. पाटलांचे योगदान यावर विवेचन केले.

संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. एम. बी. शेख, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, प्राचार्य डॉ. सुनील हेळकर यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ॲड. रवींद्र पाटील म्हणाले, की फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर अण्णांच्या लढवय्या तत्त्वज्ञानाचे मिश्रण म्हणजे एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व होय. पाटील यांच्या कार्याचा नव्या पिढीला परिचय व्हावा, यासाठी शाहू महाविद्यालयाच्या प्रांगणात रयत शिक्षण संस्थेमार्फत प्रा. डॉ. एन. डी. पाटील भवनची उभारणी करण्यात येईल.



कोल्हापूर : प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त 'सकाळ माध्यम समूह' आणि व्हाईट आर्मी कोविड सेंटरमध्ये शाहू महाविद्यालयातर्फे फळांचे करण्यात आलेले वाटप.

प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांनी, रयत शिक्षण संस्था, कोल्हापूरच्या मातीशी डॉ. पाटील यांची घट्ट नाळ जोडली आहे. त्यांच्या विचारांचा वसा, वारसा जपण्याचे कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय करीत आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात त्यांच्या नावाने उभारले जाणारे भवन महाराष्ट्राचे ऊर्जास्रोत ठरेल, असे सांगितले. डॉ. संजय साठे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. डुबल यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
17/07/2021 Page No. 4